महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २४३ वा | दिनांक : २३/०७/२०२५ | वार : बुधवार

## महाराष्ट्रात रमीला राजमान्यता द्या : अंबादास दानवे यांचा कृषिमंत्र्यांना टोला



**मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते तथा विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी विधिमंडळात कथितपणे रमीचा डाव खेळणाऱ्या कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचा खरपूस समाचार घेतला आहे. महायुती सरकारने महाराष्ट्रात रमीला राजमान्यता द्यावी. तसेच या प्रकरणीचा अध्यादेश तातडीने जारी करावा, असे ते म्हणालेत.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचा विधिमंडळात मोबाईलवर रमी गेम खेळतानाचा एक व्हिडिओ पोस्ट केला आहे. या व्हिडिओमुळे महायुती सरकारची पुरती अब्रू केली आहे. विशेषतः उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसचीही या प्रकरणी पुरती नामुष्की झाली आहे. या घटनाक्रमानंतर माणिकराव कोकाटे यांनी मंगळवारी सकाळी पत्रकारांशी संवाद साधताना आपण कोणतीही मोठी चूक केली नसल्याचा दावा केला. तसेच या प्रकरणी विरोधकांनी केलेले आरोपही फेटाळून लावले. या पार्श्वभूमीवर अंबादास दानवे यांनी त्यांच्यावर हल्ला चढवला आहे.

कृषिमंत्र्यांनी आपण रमी खेळत होतो हे कबुल केले पाहिजे. रमी खेळताना ते आपले डोके खाजवत होते. पॉपअपसाठी डोके खाजवावे लागते का? तुम्ही राज्याचे कृषिमंत्री आहात. या प्रकरणी मुख्यमंत्री हतबल झालेत. अजित पवार यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त कोकाटे यांचा राजीनामा घेऊन तो महाराष्ट्राला गिफ्ट करावा. सरकारनेही रमीला राजमान्यता द्यावी. तसा अध्यादेशही काढावा. त्यानंतर त्यांनी बिनधास्त रमी खेळावी. त्यांनी बिनधास्तपणे कोर्टात जावे, असे अंबादास दानवे म्हणाले.

ते पुढे म्हणाले, राज्याचा कृषिमंत्रीच एवढा असंवेदनशील असेल तर शेतकऱ्यांचा वाली कोण? इतर राज्यात रमीवर बंदी असेल तर आपल्याकडेही अशी बंदी केली पाहिजे. आज महाराष्ट्राच्या अब्रूची लक्तरे वेशीला टांगली गेली आहेत. सरकारचा एकही मंत्री समाधानकारक काम करू शकत नाही. तुम्ही रमी खेळत होते की नव्हते हा मुद्दा नाही. झूम करून पाहिले तर कळेल ते कोणते पत्ते खेळत होते.

उल्लेखनीय बाब म्हणजे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी या वादाप्रकरणी आज पुन्हा एकदा स्पष्टीकरण दिले. ते म्हणाले, हा अतिशय छोटा विषय आहे. तो एवढा का लांबला? हे कळत नाही. ऑनलाईन रमी तुम्हाला माहिती आहे का? त्याला बँकेचे खाते जोडावे लागते. माझा कोणताही मोबाईल क्रमांक व बँक खाते ऑनलाईन रमीच्या एपला जोडलेले नाही. कुठेही चौकशी करा. ज्या दिवसापासून ऑनलाईन रमीचा गेम सुरू झाला, तेव्हापासून आजतागायत मी एकाही रुपयाची रमी खेळली नाही. किंबहुना मला ती खेळताही येत नाही. त्यामुळे माझ्यावरील आरोप बिनबुडाचे आहेत. या आरोपांमुळे माझी बदनामी झाली आहे. या प्रकरणी मी संबंधितांवर कोर्टात दाद मागेल.

मी त्यादिवशी सभागृहात होतो. माझे एक काम होते. मला माझ्या ओएसडीकडून माहिती हवी असेल तर मला त्याला एसएमएस किंवा फोन करावा लागतो. त्यांना त्याशिवाय सभागृहात येता येत नाही. त्यासाठी मी एक मोबाईल मागवला. मोबाईल उघडल्यावर त्याच्यावर गेम आला. त्या गेमचा सारखा पॉपअप येतो. तो मला स्कीप करता आला नाही. कारण, तो मोबाईल माझ्यासाठी नवीन होता. त्यामुळे तो गेम स्कीप करण्यास मला वेळ लागला. पण विरोधकांनी गेम स्कीप केल्याचा व्हिडिओ तुम्हाला दाखवलाच नाही, असे कोकाटे म्हणाले होते.

## दिलगिरी व्यक्त करून जनतेच्या भावनांचा आदर करावा - प्रवीण दरेकर

**मुंबई :** राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे विधिमंडळ कामकाज सुरू असताना रमी खेळत असल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी हा व्हिडिओ व्हायरल केला होता. त्यानंतर विरोधकांनी हा मुद्दा उचलून धरला असून माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. यावर माणिकराव कोकाटे यांनी आज पत्रकार परिषद घेत स्पष्टीकरण दिले की मला रमी खेळता येत नाही. तसेच राजीनामा देण्यासारखे काय केले? असा सवाल देखील त्यांनी उपस्थित केला. त्यांच्या आजच्या पत्रकार परिषदेवर भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी प्रतिक्रिया देत मैत्रीचा सल्ला देखील दिला आहे.

प्रवीण दरेकर म्हणाले, जी काही घटना घडली ती जनतेला आवडलेली नाही. अशा वेळेला या विषयावर आपली बाजू आणखी ताकदीने मांडण्यापेक्षा दिलगिरी व्यक्त करून जनतेच्या भावनांचा आदर केला पाहिजे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत समर्पक अशा प्रकारची प्रतिक्रिया दिली आहे. अशा प्रकारची गोष्ट निश्चितच भूषणावह नाही. कारण विधिमंडळाच्या सभागृहात कामकाज करत असताना त्याचे गांभीर्य असणे हे त्यांनी अधोरेखित केले आहे. माणिकराव कोकाटे यांनी हा विषय संपवला पाहिजे, त्याचे तुष्टीकरण करण्याची अवश्यता नाही.

पुढे प्रवीण दरेकर म्हणाले, मीडिया पण काही चुकीचे दाखवत नाही. स्वयंस्पष्ट चित्र दिसत आहे, त्यामुळे मीडियात सुद्धा त्यांनी काही जाणीवपूर्वक केले असे समजून मीडियाला दोष देण्यात अर्थ आहे असे मला वाटत नाही. यात आत्मविश्वास असण्याची आवश्यकता नाही, कारण निश्चितच ते राज्यातले ते सिनियर आमदार आहेत. पण, मीच केलेले योग्य आहे असे काही सांगण्याचा खटाटोप करण्याची आवश्यकता आहे, असे मला वाटत नाही. त्यांनी विनाकारण विषय वाढू नये, असा माझा त्यांना मित्रत्वाचा सल्ला आहे.

माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. यामुळे सरकारवर विरोधक दबाव टाकत आहेत का? असा प्रश्न त्यांना विचारला असता प्रवीण दरेकर म्हणाले, विरोधकांचे कामच दबाव टाकण्याचे असते. सत्ताधारी पक्षाचे एखादे कृत्य दिसले की त्याचा इश्यू विरोधक करतच असतात. पण आपणच एक प्रकारे विरोधकांना विरोध करण्यासाठी हत्यार देत असतो, अशी प्रतिक्रिया दरेकर यांनी दिली आहे.

## महाराष्ट्र गुन्हेगारांना अभय देणाऱ्या नेत्यांच्या ताब्यात - अंजली दमानिया



**मुंबई :** राज्यातील सत्ताधाऱ्यांविरोधात अंजली दमानिया यांनी पुन्हा एकदा आक्रमक भूमिका घेतली आहे. माणिकराव कोकाटे यांचे वादग्रस्त रमी खेळतानाचे व्हिडिओ, सूरज चव्हाण यांच्याकडून झालेली मारहाण, आणि ऋषिकेश टकलेच्या सुटकेनंतर निघालेली मिरवणूक यावरून दमानिया यांनी सरकारवर, पोलिसांवर आणि सत्ताधारी पक्षाच्या जबाबदारीवर गंभीर सवाल उपस्थित केले आहेत. "हे गुंड राजकारणी कसे?" असा थेट सवाल करत, गुन्हेगारांना संरक्षण देणाऱ्या व्यवस्थेवर त्यांनी खरमरीत टीका केली आहे.

अंजली दमानिया म्हणाल्या की, माणिकराव कोकाटे यांचा निषेध करण्यासाठी काही जणांनी लातूरमध्ये सुनील तटकरे यांच्यासमोर पत्त्याचे कॅट टाकले तेव्हा सुरज चव्हाणकडून त्यांना बेदम मारहाण करण्यात आली. त्यांच्यावर अतिशय गंभीर असे ८ सेक्शन लागले आहे.गंभीर सेक्शन लागले असताना त्यांना अजून अटक झालेली नाही. सुरज चव्हाण यांनी केवळ संघटनात्मक पदाचा राजीनामा दिला आहे. महाराष्ट्र युवक कल्याण मंडळाच्या पदाचा राजीनामा दिलेला नाही. राजीनामे सोडा यांच्यावर कारवाई झाली पाहिजे, आज मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांचा वाढदिवस आहे, त्यांना सांगायचे आहे की महाराष्ट्र आता हे खपवून घेणार नाही.

अंजली दमानिया म्हणाल्या की, माणिकराव कोकाटे यांची रमी खेळतानाची दृश्ये आपण बघितली. त्यानंतर आज झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांना बोलता येत नव्हते, त्यांचे ततपप होत होते. मोबाईल नंबर काय सांगितला, बोलत असताना काही सूचत नव्हते. शेतकऱ्यांची कळवळ आहे अशी पत्रकार परिषद सुरू केली. पण पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर त्यांच्याकडे उत्तर नव्हती. यानंतर त्यांनी त्यांच्यावर केस करेल असे म्हणत मी दुसरे काही तरी करत होतो त्यात तो व्हिडिओ आला असे सांगण्याचा प्रयत्न केला.

अंजली दमानिया म्हणाल्या की, विधिमंडळाच्या आवारात झालेली मारामारी आपण सर्वांनी पाहिली आहे. यामध्ये पडळकर आणि आव्हाड यांचे कार्यकर्ते भिडले. त्यामधील ऋषिकेश टकले नावाचा माणूस हा अट्टल गुन्हेगार आहे, त्यांच्यावर अनेक गुन्हे दाखल आहेत अशा व्यक्तीला जेव्हा अटक होते. तिथून सुटल्यावर तो मिरवणूक काढतो त्याचे व्हिडिओ पाहून संताप होतो. ह्यामुळे राज्यातील जनतेचा संताप होतो.

अंजली दमानिया म्हणाल्या की, ह्या गुंड आणि मवाली लोकांना राजकीय नेते म्हणता येणार नाही.हे कुठलेही लोकप्रतिनिधी नाही. ना हे देशाची आणि लोकांची सेवा करण्यासाठी आले नाहीत, असे म्हणत ऋषिकेश टकलेच्या सुटकेनंतर काढलेल्या मिरवणुकीवरही अंजली दमानिया यांनी जोरदार हल्लाबोल केला आहे.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २३ जुलै २०२५


## लोणार तालुक्यातील हिरडव येथे ढगफुटी सदृश्य पावसामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान



**बुलढाणा (महेश मुंढे) :** हिरडव (ता. लोणार) —दि. २२ जुलै २०२५ ला बुलडाणा जिल्ह्यातील लोणार तालुक्यातील हिरडव गावात सकाळी झालेल्या ढगफुटीमुळे गावात भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. अतिवृष्टीमुळे शेतजमिनींमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचले असून शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे. घरांमध्ये पाणी शिरल्यामुळे नागरिकांच्या संसरोपयोगी वस्तूंचेही मोठे नुकसान झाले आहे.ढगफुटीसदृश पावसामुळे गावातील नाल्यांना पूर आला आणि काही वेळातच पाणी गावात शिरले. अचानक आलेल्या पाण्यामुळे नागरिकांना सावध होण्यास फारसा वेळ मिळालाच नाही. अनेक घरात पाणी घुसल्यामुळे अन्नधान्य, कपडे, इलेक्ट्रॉनिक साहित्य यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. काही ठिकाणी घरांची भिंत पडल्याचेही वृत्त आहे.शेतकरी वर्ग सर्वाधिक त्रस्त झाला असून अनेक एकर क्षेत्रातील उभे पिके पाण्याखाली गेली आहेत. मुख्यत्वे सोयाबीन, उडीद, मुग, कपाशी यांसारख्या पिकांचे मोठे नुकसान झाल्याचे प्राथमिक पाहणीत स्पष्ट झाले आहे. स्थानिक प्रशासनाने पंचनाम्याचे काम सुरू करावे.स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडून तत्काळ मदतीची मागणी केली आहे. तसेच शेतकऱ्यांना नुकसानभरपाई तातडीने मिळावी, अशी मागणी देखील केली आहे.

## बुद्धिस्ट इंडस्ट्रिज मॅन्युफॅक्चर्स अँड ट्रेडर्स असोसिएशन (BIMATA) शपथविधी समारंभ संपन्न




**छत्रपती संभाजीनगर :** येथे बुद्धिस्ट इंडस्ट्रिज मॅन्युफॅक्चर्स अँड ट्रेडर्स असोसिएशन (BIMATA) च्या शपथविधी समारंभाचे आयोजन करण्यात आले. या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून मा. संजयजी शिरसाट, कॅबिनेट मंत्री - सामाजिक न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य, पालकमंत्री — छ. संभाजी नगर जिल्हा, शिवसेना आणि प्रमुख प्रवक्ते शिवसेना उपस्थित होते.समारंभाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली, ज्यामध्ये मा. संजयजी शिरसाट, मा. मिलिंदजी थोरात आणि मा. सुभाष मुदगडकर यांनी आपापल्या हस्ते दीप प्रज्वलित केले. या कार्यक्रमाच्या उद्घाटनासाठी सामूहिक बुद्धवंदना श्री. एल. एल. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.कार्यक्रमाचे स्वागत भाषण उपाध्यक्ष श्री. सुभाष मोरे यांनी केले. त्यांनी BIMATA च्या उद्देश आणि आगामी कार्यप्रणालीविषयी माहिती दिली. यानंतर, मा. मिलिंदजी थोरात यांनी आपले विचार व्यक्त करत, BIMATA च्या कार्यभाराचे हस्तांतरण केले.शपथविधी समारंभ:या समारंभात, शपथवाचन अधिकारी म्हणून मा. दुष्यंत आठवले यांनी शपथविधी कार्यक्रम पार पडला. शपथ घेतल्यानंतर, प्रत्येक शपथ घेणाऱ्याला पुष्पगुच्छ देण्यात आले, आणि शपथनोंद अधिकाऱ्याकडे नोंदवहीत स्वाक्षरी करण्यासाठी त्यांना आग्रह केला.नव नियुक्त पदाधिकारी खालील प्रमाणे : १. सुभाष मुदगडकर — अध्यक्ष२. सुभाष मोरे — उपाध्यक्ष३. उत्तमराव वाकडे — अतिरिक्त उपाध्यक्ष ४. प्रमोद राऊत — सचिव ५. विनोद अवसरमल — सहसचिव६. रामचंद्र पठारे — कोशाध्यक्ष७. रवी खैरनार — जनसंपर्क अधिकारी८. सूरज दुमने — संचालक (Skill Development)९. रविकुमार वसाटे — संचालक१०. मिलिंद बागुल — संचालक (Editor — BIMATA E-News)११. बाळासाहेब पठारे — संचालक१२. संदीप साळवे — स्वीकृत संचालक१३. रामप्रसाद शिंदे — स्वीकृत संचालक१४. रवींद्र दिवेकर — स्वीकृत संचालक१५. संदीप पाटील — स्वीकृत संचालक१६. हर्षानंद तायडे — स्वीकृत संचालक१७. मिलिंद काशिदे — स्वीकृत संचालकअध्यक्षीय भाषण:नव नियुक्त अध्यक्ष मा. सुभाष भानुदास मुदगडकर यांनी BIMATA च्या उद्देशाबद्दल सांगितले, की BIMATA चा मुख्य उद्देश SC/ST समाजातील उद्योजकांना सक्षम बनवणे आहे, जेणेकरून ते उद्योगक्षेत्रात यशस्वी होऊ शकतील. त्यांनी त्यांच्या अध्यक्षीय कार्यकाळात एससी/एसटी उद्योजकांना विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आणि कार्यक्षमतेने उपाययोजना करणार असल्याचे सदस्यांना आश्वासन दिले.मुख्य पाहुणे मा. संजयजी शिरसाटयांनी उपस्थित उद्योजकांना शुभेच्छा दिल्या आणि मार्गदर्शन देखील केले. संजयजी शिरसाट यांनी आपल्या भाषणात SC/ST समाजासाठी लागू असलेल्या योजनांमध्ये असलेल्या संधींविषयी चर्चा केली. त्यांनी आपल्या संघर्षाच्या कथा सांगितल्या, कसे त्यांनी सामान्य कुटुंबातून कॅबिनेट मंत्री पदापर्यंत पोहचले. त्यांनी सर्व युवा उद्योजकांना मार्गदर्शन करत, मेहनत आणि प्रयत्नांवर विश्वास ठेवून आपल्या स्वप्नांची पूर्तता करण्याची प्रेरणा दिली. त्यांना हे लक्षात ठेवण्याचे आवाहन केले की, "स्वप्नांची पूर्तता करण्यासाठी मेहनत आणि साधना गरजेची असल्याचे नमूद केले आणि BIMATA च्या सर्व नव नियुक्त पदाधिकारी यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. BIMATA ची प्रमुख मागणी:कार्यक्रमाच्या समारोपानंतर, BIMATA ने मुख्य मागण्यांचे ज्ञापन मा. संजयजी शिरसाट यांच्याकडे सादर केले. यामध्ये SC/ST समाजासाठी स्वतंत्र औद्योगिक क्लस्टर, सवलतीच्या कर्ज योजनांचा अधिक प्रवेश, MIDC प्लॉट वाटपामध्ये आरक्षण, आणि Skill Development केंद्रांची आवश्यकता यावर भर दिला.BIMATA चे कार्यक्षेत्र आणि उद्दिष्टे हे एससी/एसटी समाजातील उद्योजकांना सक्षम करण्यासाठी विविध योजनांमध्ये समृद्धी आणण्याचे आहे. आगामी काळात, BIMATA च्या माध्यमातून विविध प्रशिक्षण, सल्ला आणि सहाय्य मिळवून, उर्जावान आणि सक्षम SC/ST उद्योजक तयार करणे हे मुख्य लक्ष असणार असल्याचे मत उपस्थित सर्व सदस्यांनी एकमताने मान्य केले. BIMATA च्या या मार्गदर्शनाने आणि मागण्यांनी व्यवसाय क्षेत्रातील SC/ST समाजाच्या विकासासाठी एक महत्त्वाची दिशा दाखवली आहे.समारंभाच्या समाप्तीला, सर्व उपस्थितांना आणि व्यापारी बांधवांना यश, समृद्धी आणि विकासाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाच्या समारोपानंतर, प्रमोदजी राऊत यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. त्यांनी BIMATA च्या पुढील कार्यासाठी सर्वांचे योगदान आणि सहकार्य महत्त्वाचे असल्याचे सांगितले.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103
8830838903



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २३ जुलै २०२५


# ज्येष्ठ नागरिकांसाठी महाराष्ट्र शासनाचा महत्त्वपूर्ण निर्णय



**१५ जुलै २०२५ रोजी** महाराष्ट्र शासनाने राज्यातील ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनात आशेचा नवा किरण घेऊन येणारा एक अत्यंत महत्वाचा आणि ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. "महाराष्ट्र राज्यातील ज्येष्ठ नागरिक (सेवा, सुविधा इत्यादी देण्याबाबत) अधिनियम, २०२५" हे विधेयक (विधानसभा विधेयक क्रमांक ७२, सन २०२५) नुकतेच महाराष्ट्र विधानसभेत सादर करण्यात आले आहे. हे विधेयक विधानमंडळाच्या मंजुरीनंतर तात्काळ प्रभावाने अंमलात येणार आहे, ज्यामुळे राज्यातील हजारो ज्येष्ठ नागरिकांचे जीवनमान सुधारण्यास आणि त्यांना सन्मानाने जगण्यास मदत होणार आहे.

**ज्येष्ठ नागरिक कोण आणि त्यांना काय मिळणार?** :- या महत्त्वाकांक्षी अधिनियमानुसार, महाराष्ट्रातील ज्या व्यक्तींचे (पुरुष अथवा महिला) वय ६५ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक आहे, त्यांना 'ज्येष्ठ नागरिक' म्हणून परिभाषित करण्यात आले आहे. शासनाने या ज्येष्ठ नागरिकांसाठी अनेक महत्त्वपूर्ण सोयी-सुविधा त्वरित उपलब्ध करून देण्याची ग्वाही दिली आहे. यामध्ये प्रामुख्याने आर्थिक सहाय्य, आरोग्य सेवा, आणि सामाजिक सुरक्षेचा समावेश आहे.

**आर्थिक आणि आरोग्य विषयक सहाय्य:-** या विधेयकातील तरतुदीनुसार, ज्येष्ठ नागरिकांना आर्थिक सहाय्य म्हणून दरमहा रु. ७,०००/- मानधन दिले जाईल. हा आर्थिक आधार अनेक गरजू ज्येष्ठांना दैनंदिन गरजा पूर्ण करण्यास मदत करेल. त्याचबरोबर, आरोग्याच्या दृष्टीने एक मोठा दिलासा म्हणून, ज्येष्ठ नागरिक आजारी पडल्यास त्यांना शासकीय किंवा निमशासकीय रुग्णालयांमध्ये रु. ५ लाखांपर्यंत मोफत आरोग्य सेवा मिळेल. वृद्धापकाळात येणाऱ्या विविध व्याधींवर उपचार घेण्यासाठी ही तरतूद अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

**सामाजिक आणि सांस्कृतिक सुविधा:-** आर्थिक आणि आरोग्य सेवेबरोबरच, सामाजिक आणि सांस्कृतिक गरजांकडेही शासनाने लक्ष दिले आहे. ज्येष्ठ नागरिकांना दरवर्षी महाराष्ट्र दर्शनासाठी रु. १५,०००/- पर्यंत अनुदान उपलब्ध करून दिले जाईल. यातून त्यांना महाराष्ट्रातील विविध ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांना भेट देऊन सांस्कृतिक अनुभव घेता येईल. याव्यतिरिक्त, ज्या ज्येष्ठ नागरिकांना वारस नाहीत किंवा ज्यांचे वारस त्यांचा सांभाळ करत नाहीत, अशा निराधार ज्येष्ठांची राहण्याची आणि जेवणाची सर्व व्यवस्था शासनामार्फत केली जाईल. ही तरतूद समाजातील दुर्बळ घटकांना आधार देणारी आहे.

**समस्या निवारणासाठी टोलफ्री हेल्पलाईन:-** ज्येष्ठ नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध समस्या आणि तक्रारींचे निवारण करण्यासाठी एक टोलफ्री हेल्पलाईन देखील सुरू केली जाईल. यामुळे ज्येष्ठ नागरिकांना आपल्या अडचणी मांडण्यासाठी आणि त्यावर त्वरित उपाय शोधण्यासाठी एक अधिकृत व्यासपीठ उपलब्ध होईल. ही हेल्पलाईन ज्येष्ठांसाठी एक विश्वासार्ह आधारस्तंभ ठरेल.

**विधेयकाचा उद्देश आणि त्याची आवश्यकता:-** या विधेयकाचे मुख्य उद्दिष्ट आणि कारणे स्पष्ट करताना शासनाने म्हटले आहे की, महाराष्ट्र राज्यात दिवसेंदिवस ज्येष्ठ नागरिकांची संख्या वाढत आहे. अनेक ज्येष्ठ नागरिकांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची असून, काहीजण निराधार अवस्थेत जीवन जगत आहेत. वृद्धापकाळात त्यांना विविध शारीरिक व्याधी जडतात, परंतु औषधोपचारासाठी त्यांच्याकडे पैसे नसतात आणि त्यांना कोणी आर्थिक मदतही करत नाही. अशा परिस्थितीत, केंद्र व राज्य शासनाने आखलेल्या सध्याच्या योजना अपुऱ्या असल्याने ज्येष्ठ नागरिकांना अधिक सोयी आणि सवलती देण्यासाठी कायदेशीर तरतूद करणे आवश्यक होते.

**सध्याच्या योजनांवरील एक दृष्टिक्षेप:-** सध्या केंद्र शासनाने ७० वर्षांवरील वृद्धांसाठी प्रधानमंत्री आयुष्मान वय वंदना योजना सुरू केली आहे. रेल्वेतर्फे ६० वर्षांवरील महिला प्रवाशांना रेल्वे तिकिटात ५० टक्के आणि ६५ वर्षांवरील पुरुष प्रवाशांना ५० टक्के सवलत दिली जाते. तसेच, राज्य परिवहन महामंडळाने ज्येष्ठ महिला व पुरुषांना तिकिटात ५० टक्के सवलत दिली आहे. तथापि, विविध योजनांसाठी ज्येष्ठ नागरिकांच्या वयाची अट वेगवेगळी आहे. प्रस्तावित योजनेसाठी कमीत कमी ६५ वर्षे पूर्ण व त्यावरील वयाची अट ठेवणे आवश्यक असल्याचे या विधेयकात नमूद केले आहे.

**आर्थिक परिणाम आणि भविष्यातील अंमलबजावणी:** या विधेयकातील तरतुदींमुळे राज्याच्या एकत्रित निधीतून आवर्ती खर्च होण्याची शक्यता आहे. ६५ वर्षे पूर्ण करणाऱ्या राज्यातील ज्येष्ठ नागरिकांना दरमहा ७,००० रुपये आर्थिक सहाय्य, ५ लाख रुपयांपर्यंत मोफत आरोग्य सेवा आणि १५,००० रुपयांपर्यंत महाराष्ट्र दर्शनासाठी अनुदान तसेच निराधार ज्येष्ठांची राहण्याची व जेवणाची व्यवस्था यासाठी निधी खर्च केला जाईल. सद्यस्थितीत या अधिनियमाच्या अंमलबजावणीवरील नेमका खर्च नमूद करणे शक्य नाही, तरीही शासनाने ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी हा मोठा आर्थिक भार उचलण्याची तयारी दर्शविली आहे.

एकूणच, महाराष्ट्र शासनाचा हा निर्णय राज्यातील ज्येष्ठ नागरिकांच्या हितासाठी एक मैलाचा दगड ठरणार आहे. या नवीन तरतुदींमुळे ज्येष्ठ नागरिकांना सामाजिक आणि आर्थिक सुरक्षा मिळेल, ज्यामुळे ते सन्मानाने आणि सुरक्षितपणे आपले जीवन जगू शकतील. हे विधेयक महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रामध्ये १५ जुलै २०२५ रोजी प्रकाशित झाले आहे.


**डॉ. राजेंद्र बगाटे**
**(समाजशास्त्र आणि वृद्धत्वशास्त्राचे अभ्यासक)**
**मो. क्र.- ९९६०१०३५८२**


# करोडी टोल नाक्यावर ८३ लाख रुपयांचा प्रतिबंधित गुटखा सह वाहन गुन्हे शाखेचे पोलिसांनी पकडला






**दौलताबाद (जावेद अहमद) :** 21 जुलै रोजी रात्री शहर गुन्हा शाखेचे पोलीस उपनिरीक्षक नवनाथ पाटवदकर आपल्या सहकाऱ्यां सोबत गस्तीवर असताना गुप्त बातमी मिळाली कीं समृद्धी जंक्शन माळीवाडा करोडी टोल नाक्यावर ट्रक क्र डी.डी. ०१.जी.९०९२ ही दिसली गाडी थांबवुन चा चालक यास नाव विचारले असता त्याने त्याचे नाव बनेसिंग बाबुलाल कटारीया वय 37 वर्ष रा. बडागाव ता. नलखेडा जि.अगर मालवा बदुर्गी शाजापुर असे सांगीतले त्यास गाडीत माल काय आहे, असे विचारले असता त्याने सांगितले की गाडीत गुटखा आहे. व तो अमरावती महाराष्ट्र येथुन मुंबई येथे घेवुन जात असल्याचे सांगीतले. त्यावरुन सोबत असलेले अन्न व सुरक्षा अधिकारी शशिकांत कुचेकर यांना मीळालेल्या मालाचा पंचनामा करुन वाहनामध्ये शासनाने प्रतिबंधीत केलेला 56 लाख 25 हजार रुपये किमंतीचा बाजीराव सुगंधीत पान मसाला गुटखाच्या 75 गोण्या सुगंधीत पानमसाला गुटखा,6 लाख 75 रुपये किमतीचा मस्तानी जर्दा व सदर वाहतुक करण्याकरीता वापरलेली 20 लाख रुपये आयशर असा एकुण 83 लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून सदर इसमांविरुध्द पोलीस ठाणे दौलताबाद येथे गु.र.नं. १२१/२०२५ कलम १२३,१२४,२७४,२७५,३(५) भारतीय न्याय संहिता सहकलम २६ (१) (२) (iv), २७(३)(d),२७(३)(e), ३०(२)(a),५९ अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम २००६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलीस निरीक्षक संभाजी पवार गुन्हे शाखा यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक नवनाथ पाटवदकर पोलीस अंमलदार सतिष हंबर्डे, संतोष भानुसे, शैलेश आस्कर, यशवंत गोबाडे व अन्न व सुरक्षा महामंडळ अधिकारी शशिकांत कुचेकर यांनी केली आहे.


प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २३ जुलै २०२५


## नवयुवक उद्योजक चे मृत्यूदेह पुला खाली संशयास्पद स्तिथीत सापडले



**दौलताबाद (जावेद अहमद)** : (21) सोमवार रोजी धुळे सोलापूर महामार्गावरील करोडी टोल नाक्याजवळ आसेगाव नदीपुला जवळ एक दुचाकी धडकलेली असल्याचे व एक जण मृत्यु अवस्थेत पुला खाली पडले असल्याचे माहिती दौलताबाद पोलीस स्टेशनमध्ये मिळाली माहिती मिळताच पोलीस निरीक्षक रेखा लोंढे,उपनिरीक्षक आयुब पठाण,सुनील बोडखे,दादाराव बनसोडे, पोलीस अंमलदार ज्ञानेश्वर कोळी,महेश घुगे,साईनाथ सोनवणे, खुशाल पाटील,पोलीस पाटील बाळू कांबळे यांनी घटनास्थळी धाव घेत जखमी असलेल्या तरूणाला रुग्णवाहिका ने उपचारासाठी घाटी रुग्णालयात दाखल केले वैद्यकीय अधिकारी यांनी तपासून त्याला मयत घोषित केलेमयत जवळ असलेले आधारकार्ड व मोबाईल यांच्यवरून ओळख पटली दुचाकी स्वार सागर रामभाऊ परळकर वय ३६ वर्ष राहणार कांचनवाडी छत्रपती संभाजीनगर असे आहेरामभाऊ यांची दुचाकी पेंशन प्रो क्र MH२० CE १९५ मिळून आली आहे रामभाऊ यांचे हा पुलावरून खाली ४० फूट खोल खाली पडलेले मिळून आलें आहे त्यांचे दोन मोबाईल भिंतीवर एका बाजूला पडलेले मिळून आलेरामभाऊ हा उद्योजक होता त्याचे वाळूज येथे पुष्पक ऍग्रो कंपनी असून तो त्याचा संचालक होता तर अजून त्याचे त्या कंपनी मध्ये तीन मित्र संचालक आहेत्याचा पश्चात आई ,पत्नी ,दोन मुले आहेपोलिसांनी घटनास्थळी पाहणी करण्यासाठी श्वान पथक पाचारण करण्यात आले रात्री उशिरापर्यंत पोलीस निरीक्षक रेखा लोंढे यांना घटनेची तातपर्यता ओळखून आपल्या अधिकारी कर्मचारी सोबत घटनास्थळी बारकाईने निरीक्षण करून शोध घेतले पत्नी ला रविवारी रात्री नऊ वाजता फोन करून सांगितले होते की तासाभरात येतो आणि काही तासात मृत्यूदेह मिळून आले अपघात कसा झाला आहे हे पोलीस तपासात निष्पन्न होईल.

## अधिकारी पत्नीचे आंघोळ करतानाचे व्हिडिओ केले रेकॉर्ड



**पुणे** : महाराष्ट्रात सध्या अधिकारी आणि राजकारण्यांचा हनीट्रॅपचा मुद्दा गाजत असतानाच पुण्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. अधिकारी असलेल्या पत्नीवर नजर ठेवण्यासाठी क्लास वन अधिकाऱ्याने घरातच स्पाय कॅमेरे बसवले. या कॅमेराच्या माध्यमातून या अधिकाऱ्याने आपल्या पत्नीवर नजर ठेवणे सुरू केले. धक्कादायक बाब म्हणजे पत्नीच्या अंघोळीचे व्हिडिओ काढून ब्लॅकमेल देखील केले. यानंतर पत्नीने आपल्या क्लास वन अधिकारी पतीसह सासरच्या सात जणांवर आंबेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

अंघोळीचे व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत क्लास वन अधिकारी त्याच्या पत्नीकडून माहेरून गाडी आणि कारच्या हप्त्यासाठी दीड लाखांची मागणी करत मानसिक छळ करत असल्याचे अधिकारी पत्नीने सांगितले. याप्रकरणी पतीसह सासरच्या सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात सासू, सासरे, दीर आणि इतर नातेवाईकांचा समावेश आहे.

सन २०२० मध्ये पीडितेचा संबंधित क्लास वन अधिकाऱ्यासोबत विवाह झाला होता. सुरुवातीला त्यांचा संसार सुरळीत आणि आनंदात सुरू झाला. मात्र काही काळातच पतीने पत्नीवर संशय घेण्यास सुरुवात केली. त्यानंतर त्याचे वागणे अधिक त्रासदायक बनत गेले. पती वारंवार पैशांची मागणी करत होता आणि त्यासाठी पत्नीवर मानसिक दबाव टाकत होता. यासोबतच तिच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी त्याने घरात गुप्त स्पाय कॅमेरे बसवले.

ऑफिसमध्ये गेल्यावर आपल्या पत्नीवर हा अधिकारी आपल्या पत्नीवर नजर ठेवायचा. इतकेच नव्हे तर या अधिकाऱ्याने बाथरूममध्ये देखील स्पाय कॅमेरे बसवले. या माध्यमातून पत्नीचे अंघोळीचे व्हिडिओ त्याने रेकॉर्ड केले असल्याचे समोर आले आहे. अंघोळीचे व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी त्याने पत्नीला दिली. तसेच गाडी आणि घरच्या हप्त्यासाठी दीड लाख रुपये माहेरून घेऊन येण्यासाठी जबरदस्ती सुरू केली.

आपल्याला पतीकडून मानसिक आणि शारिरीक छळ होत असल्याचा आरोप करत त्या पत्नीने पोलिसात धाव घेतली आहे. यामध्ये स्पाय कॅमेराच्या व्हिडीओंचीही तक्रार करण्यात आली आहे. या प्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला असून पोलिस पुढील तपास करत आहेत.

## आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन




**पुणे** : सध्या राज्यात आणि देशभरात जाती जाती आणि धर्मा धर्माच्या मध्ये मोठ्या प्रमाणात विद्वेष निर्माण केला जात आहे. त्यामुळे जाती आणि धर्माच्या पलीकडे जाऊन जोडीदार निवडण्याची इच्छा असलेल्या लोकांसाठी असे जोडीदार शोधणे अत्यंत अवघड झाले आहे. या पार्श्वभूमीवर जाती जातींमधल्या भिंती तोडण्यासाठीचा कृती कार्यक्रम म्हणून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने राज्यस्तरीय आंतरजातीय आंतरधर्मीय वधू वर सूचक केंद्र सुरू केले आहे. या केंद्रामध्ये आंतरजातीय आंतरधर्मीय विवाह स्वेच्छेने करणाऱ्या वधू वरांनी आणि पालकांनी आपली नाव नोंदणी करावी असे आवाहन या केंद्राचे राज्य समन्वयक शंकर कणसे आणि डॉ. ज्ञानदेव सरवदे यांनी डॉ.नरेंद्र दाभोलकर हे 'जात ही एक मोठी अंधश्रद्धा आहे' असे म्हणत असत. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही 'आंतरजातीय विवाह मोठ्या प्रमाणात झाले तर जाती निर्मूलन लवकर होईल' असे मानत. त्यानुसार गेली अनेक वर्षे अंधश्रद्धा निर्मूलन समिती आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह लावते. आजअखेर असे शेकडो विवाह अंनिस मार्फत राज्यभर लावण्यात आले आहेत. अशा विवाह करणाऱ्या मुला मुलींना महाराष्ट्रातील पहिले सुरक्षित निवारा केंद्र, रहिमतपूर (सेफ हाऊस) सातारा येथे चालू केले आहे. आंतरजातीय आंतरधर्मीय विवाहांना पाठबळ देण्यासाठी राज्य आणि केंद्र सरकार ही विविध योजना राबवते.

अंनिसच्या या केंद्रामध्ये वधू-वरांनी किंवा पालकांनी नोंदणी केल्यानंतर त्यांना सुयोग्य स्थळ सुचवले जाते. वधू-वराने आपली माहिती पाठवल्यानंतर त्यांनी जोडीदाराची निवड विचारपूर्वक केली आहे ना याची पडताळणी केली जाते. सत्यशोधकी तसेच विशेष विवाह नोंदणी कायदा याच्या अंतर्गत विवाह करावा असा सल्ला दिला जातो. नाव नोंदणीची सेवा ही विनामूल्य दिली जाते.आज समाजामध्ये प्रत्येक जातीची वेगवेगळी वधू वर सूचक केंद्र आहेत, परंतु जात धर्म न मानणाऱ्या पालकांना किंवा वधू-वरांना जर आंतरजातीय आंतरधर्मीय विवाह स्वेच्छेने करायचा असेल तर त्यांना असे केंद्र कुठेही नाही. त्यामुळे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने ही सोय महाराष्ट्रात पहिल्यांदाच उपलब्ध करून दिली आहे.

आंतरजातीय,आंतरधर्मीय तसेच विधवा- विधुर विवाह करू इच्छिणाऱ्यांनी आपली माहिती या केंद्राचे समन्वयक शंकर कणसे ( मु. पो. पिंपरी, ता. कोरेगाव, जि. सातारा संपर्क ९९२२३ ५५४३५) आणि डॉ.ज्ञानदेव सरवदे, बारामती (संपर्क ९५२७७२१४७५) यांना पाठवावी किंवा आपल्या गावातील अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांशी संपर्क साधावा असे आवाहन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्यकारिणी सदस्य डॉ. हमीद दाभोलकर यांनी केले आहे.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २३ जुलै २०२५


## वाढत्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेती व्यवसायाचा जुगार बनलाय - रोहित पवार



**पुणे** : महाराष्ट्रात मुसळधार पावसामुळे अनेक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. राज्यातील अनेक भागांमध्ये ढगफूटी सारखा पाऊस होत आहे. यामुळे शेतकऱ्यांची पिकं उद्ध्वस्त होत आहेत. वाशिम जिल्ह्यात देखील आज सकाळी जोरदार पाऊस झाला, यात हळद आणि सोयाबीन पिकांचे नुकसान झाले आहे. याचा व्हिडिओ शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी ट्विट केला आहे. तसेच या शेतकऱ्याची व्यथा सरकारपर्यंत पोहोचणार का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

रोहित पवार यांनी शेतकऱ्याचा एक व्हिडिओ पोस्ट केला आहे. या व्हिडिओमध्ये एक शेतकरी ढगफूटीसदृश पावसात उद्ध्वस्त झालेल्या पिकांची पाहणी करताना आपली वेदना बोलून दाखवताना दिसत आहे. व्हिडिओ ट्विट करत रोहित पवार म्हणाले, वाढत्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेती व्यवसायाचा जुगार बनला आहे. कधी काय होईल याचा इथे कसलाही भरवसा नाही. आज सकाळी ढगफुटीसदृश पाऊस झाल्याने वाशिम जिल्ह्यातल्या शेतकऱ्याचे उध्वस्त झालेले हळद आणि सोयाबीनचे हे शेत! या शेतकऱ्याची व्यथा सरकारपर्यंत पोहचणार का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

पुढे रोहित पवार म्हणाले, पिकविम्याचे ट्रिगर काढल्याने या शेतकऱ्याला पिक विम्याची भरपाई मिळणार नाही, मग या शेतकऱ्याने करायचे तरी काय? पिकविमा योजनेचे ट्रिगर काढून शेतकऱ्याला मृत्यूच्या सरणावर सोडू नका, शेतकरी खाक होईल. आज दोन मोठ्या नेत्यांचा वाढदिवस आहे, वाढदिवसानिमित्त तरी शेतकऱ्यांची व्यथा समजून तत्काळ आधीची पिकविमा लागू करा, ही विनंती.

दरम्यान, राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे विधिमंडळात मोबाइलवर रमी खेळतानाचा व्हिडिओ व्हायरल झाला असून यावरून विरोधकांनी चांगलेच धारेवर धरले आहे. तसेच त्यांच्या राजीनाम्याची देखील मागणी केली जात आहे. कृषिमंत्रीच जर रमी खेळत बसणार असतील तर शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवणार कोण? असा सवाल शेतकरी वर्गातून उपस्थित केला जात आहे.

## लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार ; आवडत्या खाद्यपदार्थात गर्भपाताचे औषध टाकले



महिलेला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर लैंगिक अत्याचार करून ती गर्भवती राहिल्यानंतर तिच्या न कळतच तिच्या आवडत्या खाण्याच्या पदार्थामध्ये गर्भपाताचे औषध मिसळून तिचा गर्भपात घडवून आणल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी एकाला खडकी पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. विनय सुनिल खिल्लारे उर्फ मोनु (32, पुणे) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याबाबत एका 38 वर्षीय महिलेनी खडकी पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. हा प्रकार ऑक्टोबर 2024 ते एप्रिल 2025 दरम्यान घडला. तरूणीने तिच्या तक्रारीत आरोपीने औषध मिक्स करून गर्भपात घडवून आणल्याचे म्हटले आहे. पुढील तपास खडकी पोलिस करत आहेत.

तरूणीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी हडपसर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी विकास बापु शिंदे (रा. कात्रज) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका 25 वर्षीय तरूणीने हडपसर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. हा प्रकार 2023 ते 15 जुलै 2025 दरम्यान घडला. तरूणीने तिच्या तक्रारीत आरोपीने वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचे सांगितले आहे.

स्वारगेट ते कोथरूड असा पीएमपीएलने प्रवास करणाऱ्या महिलेची सोन्याची 35 हजारांची पाटली गर्दीचा फायदा घेऊन चोरट्यांनी चोरी करून नेली. स्वारगेट परिसरात आल्यावर आपली पाटली चोरीला गेल्याचे लक्षात आल्यानंतर महिलेनी स्वारगेट पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. याबाबत सरोज मधुकर वाडेकर (52, रा. साई आंगण सोसायटी, गुरूवार पेठ, पुणे ) यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास स्वारगेट पोलिस करत आहेत.

## आमच्याकडे आणखी व्हिडिओ आहेत:सन्मानाने एक्झिट घ्या, सुषमा अंधारे यांचा माणिकराव कोकाटेंना इशारा



**पुणे** : राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे विधिमंडळ कामकाज सुरू असताना रमी खेळत असल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी हा व्हिडिओ व्हायरल केला होता. त्यानंतर विरोधकांनी हा मुद्दा उचलून धरला असून माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. यावर माणिकराव कोकाटे यांनी आज पत्रकार परिषद घेत स्पष्टीकरण दिले की मला रमी खेळता येत नाही. तसेच राजीनामा देण्यासारखे काय केले? असा सवाल देखील त्यांनी उपस्थित केला. इतकेच नव्हे तर माझी बदनामी करणाऱ्यांना कोर्टात खेचणार असल्याचा देखील त्यांनी इशारा दिला. यावर शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी प्रतिक्रिया देत थेट इशारा दिला आहे.

सुषमा अंधारे म्हणाल्या, तुमचे म्हणणे असेल की मी तुम्हाला कोर्टात खेचणार तर आम्हाला कोर्टात नंतर खेचा. तुमची आसन व्यवस्था ज्या ठिकाणी केलेली आहे, ती सर्व सत्ताधाऱ्यांची आसन व्यवस्था आहे. त्यामुळे तुमचा व्हिडिओ हा कोणत्या सत्ताधारी आमदाराने रेकॉर्ड केला? याचा पहिल्यांदा शोध घ्या. म्हणजे तुम्हाला अंदाज येईल की, तुमची माती तुमचीच माणसे करायला बसलेले आहेत. पहिले बारा सेकंदाचा, त्यानंतर आजचा २४ सेकंदाचा, आता या पुढचे वेगवेगळ्या कृती करतानाचे आपले व्हिडिओ आमच्याकडे आहेत. ते काढायला आम्हाला भाग पाडू नका. सन्मानाने एक्झिट घ्या. हे तुमच्यासाठी बरे राहील, असा इशारा अंधारे यांनी दिला आहे.

पुढे बोलताना सुषमा अंधारे म्हणाल्या, माणिकराव कोकाटे यांची उद्धट आणि उर्मटपणाची भाषाच गंभीर आहे. त्यांना विषयाचं गांभीर्य अजूनही कळत नाही. देवेंद्रजींच्या मंत्रिमंडळात जे मंत्री आहेत त्यांना आपल्या मंत्रीपदाचा औरा कॅरी करता येत नाही. नितेश राणे मंत्री असूनही बालिश आणि समाजात दुही पसरवणारी भाषा करतात. शिरसाट यांच्यासारखा अत्यंत उद्धट माणूस मंत्रीपदावर आहे आणि माणिकराव कोकाटे यांनी तर कहरच केला आहे. यावर आता यांची भाषा आहे की, आम्ही काही विनयभंग केला का? बलात्कार केला का?

सुषमा अंधारे यांनी यावेळी माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचा एक किस्सा सांगितला. त्या म्हणाल्या, माणिकराव मला आपल्याला इतिहास सांगावे लागेल. मुंबई बॉम्बस्फोटानंतर तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी आपल्यासोबत राम गोपाल वर्मा यांना फक्त घेऊन गेल्यामुळे आत्ता सत्तेत असलेले आणि तेव्हा विरोधात असलेले भाजपने गदारोळ केला होता. त्याचा परिणाम म्हणून विलासराव देशमुख यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता.

राजकीय व्यक्ती किंवा लोकप्रतिनिधीचे वर्तन, व्यवहार कुठे आणि कसे असतात हे फार महत्त्वाचे आहे. ऑनलाइन गेमिंगमुळे इथल्या पिढ्या बरबाद होत आहेत. तुम्ही चक्क सभागृहात रमी खेळतात. ज्या सभागृहातल्या कामकाजासाठी प्रत्येक सेकंदाला चार हजार सातशे रुपये खर्च होतात. हे पैसे माणिकराव तुमच्या खिशातून जात नाहीत, ते जनतेच्या टॅक्स मधून येतात. या पैशातून लोकांच्या प्रश्नांवर चर्चा होण्यासाठी अधिवेशन आहे की तुमच्यासारख्या लोकांना रमी खेळण्यासाठी आहे? असा सवाल सुषमा अंधारे यांनी उपस्थित केला.


